# दिनांक १३/२/२०१३ रोजी विपश्यना (Mitra) उपक्रमासंबंधी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त --

मित्रा उपक्रमासंबंधी दि.१३/२/२०१३ रोजी मा.संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांचे दालनात दुपारी २.०० वाजता सभा घेण्यात आली. सभेस खालीलप्रमाणे उपस्थिती होती.

१) श्री.एन.के.जरग, संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,पुणे

२) डॉ.शकुंतला काळे, सहसंचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,पुणे

३) श्री.एस.एस.शिंदे, सहआयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका

४) श्री.निखिल मेहता, विपश्यना सदस्य

५) श्रीमती अपूर्वा देशमुख, विपश्यना सदस्य

६) श्री.नानाजी आत्राम, प्राध्यापक तथा समन्वयक, म.रा.शै.सं.व प्र.प, पुणे

सभेमध्ये खालील विषयावर चर्चा करण्यात आली.

१) राज्यातील शिक्षकांसाठी विपश्यना प्रशिक्षणाचे अंदाजपत्रक याबाबत चर्चा झाली. मा.संचालक यांनी सदर बाब परिषद स्तरावरील नसून याबाबत महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांनी कार्यवाही करणे अपेक्षित असून परिषद फक्त शैक्षणिक प्रशिक्षणाचे आयोजन करीत असते असे सांगितले.

२) मित्र उपक्रमासंबंधी शिक्षकांमध्ये काय बदल झाले याबाबत जिल्हास्तरावरुन अभिप्राय घेण्याबाबत चर्चा झाली. मा.संचालकांनी याबाबत प्रश्नावली तयार केलेली असून सर्व शिक्षणाधिकारी यांचेकडून अभिप्राय मागितले आहेत. फक्त ११ शिक्षणाधिकाऱ्यांकडून अभिप्राय प्राप्त झाले असून उर्वरित शिक्षणाधिकाऱ्यांकडून १५ दिवसात अभिप्राय मागवून शासनाकडे अभिप्राय सादर करण्यात येतील. त्यावर मा.श्री.शिंदे, सहआयुक्त यांनी विद्यार्थ्यांमध्ये सुद्धा काय बदल झाले याबाबत प्रश्नावलीत ही बाब समाविष्ट करावी असे सुचविले.

३) शिक्षकांना विपश्यना प्रशिक्षणास पाठविण्याबाबत -- ही बाब संचालक (प्राथमिक/माध्यमिक) यांचे अधिनस्थ येत असून, याबाबत संबंधितांशी संपर्क करणे योग्य होईल असे मा.संचालकांनी सुचविले. तथापि, मा.श्री.शिंदे, सहआयुक्त यांनी आपलेकडे सेवांतर्गत प्रशिक्षण डाएटच्या माध्यमातून चालत असतात. या डाएटमधील अधिव्याख्यात्यांना विपश्यना प्रशिक्षण द्यावे असे सुचविले. त्यावर मा.संचालकांनी आपण याबाबतचे विभागनिहाय वेळापत्रक दिल्यास प्रत्येक डाएट, डी.एड.कॉलेजमधील अधिव्याख्यात्यांना प्रशिक्षणास पाठविता येईल असे सांगितले.

४) विपश्यना उपक्रम डी.टी.एड.च्या अभ्यासक्रमात समाविष्ट करणे --- याबाबत मा.संचालकांनी सदर बाब धोरणात्मक असून, परिषद अभ्यासक्रम कसा असावा असे ठरविते. आपणाकडून या अभ्यासक्रमाबाबत प्रस्ताव (Modul) प्राप्त झाल्यास त्याबाबत योग्य तो निर्णय घेतला जाईल असे सांगितले.

५) श्री.निखिल मेहता यांनी परिषदेमार्फत चालविल्या जाणाऱ्या जीवन शिक्षण अंकामध्ये विपश्यना उपक्रमासंबंधीचे लेख प्रसिद्ध करावे असे सुचविले. त्यावर मा.संचालकांनी आपण तसे लेख पुरविल्यास जीवन शिक्षणच्या अंकात प्रसिद्ध केले जातील असे सुचविले.

६) परिषद स्तरावर या उपक्रमासंबंधी कामकाज पाहण्यासाठी समन्वयक नेमावा असे श्री.शिंदे, सहआयुक्त यांनी सुचविले. त्यावर मा.संचालकांनी श्री.एन.जे.आत्राम, प्राध्यापक यांची समन्वयक म्हणून नेमणूक करण्यात येईल असे सुचविले.

त्यानंतर श्री.आत्राम, समन्वयक यांनी मा.सभाध्यक्ष तथा संचालक व उपस्थित सर्व विपश्यना सदस्य यांचे आभार मानून मा.अध्यक्षांचे परवानगीने सभा संपल्याचे जाहीर केले.

**( एन. के. जरग )**
**संचालक**

प्रत -- मा.श्री.एस.एस.शिंदे, सहआयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई